MHAU090029252025

| | |
|---|---|
| | दाखल तारीख : १८/०९/२०२५<br>नोंदणी तारीख : १९/०९/२०२५<br>निकाल तारीख : २०/०७/२०२६<br>कालावधी : ०० वर्षे १० महिने ०१ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पैठण यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी एस.व्ही.मेटील–पाटील )**

**कौ.हिं.म.सं.अर्ज क्र. ४१/२०२५** **निशाणी क्र. २०**

१. हाजरा वसीम बेग
वय–२४ वर्षे, धंदा– घरकाम
रा. औरंगपुरवाडी, पो.बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद.
ह.मु.सईना कॉलनी जटवाडा रोड, औरंगाबाद.

२. फातेमा वसीम बेग
वय–०५ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र. १ आई

३. जैनब वसीम बेग
वय–४ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र. १ आई

४. मोहम्मद वसीम बेग
वय–१ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र. १ आई **अर्जदार**

**विरुध्द**

१. वसीम रहीम बेग
वय–२७ वर्षे, धंदा– शेती व नोकरी

२. मदीना मोबीन शेख
वय– ३० वर्षे, धंदा– घरकाम

३. मोबीन कुंदन शेख
वय– ३३ वर्षे, धंदा–शेती,

४. मुनीम रशीद बेग

वय– ५० वर्षे, धंदा–शेती,

५. रशीद मोहम्मद बेग
वय– ५५ वर्षे, धंदा–शेती,
सर्व रा. औरंगपुरवाडी, पो.बिडकीन,
ता. पैठण, जि. औरंगाबाद. **गैरअर्जदार**

**तक्रार – घरगुती हिंसाचार कायदा कलम १८ ते २१ व २३ प्रमाणे.**

---

**अर्जदारांतर्फे विधिज्ञ** :– श्री. शेख शकील
**गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ** :– एकतर्फा

---

**न्यायनिर्णय**

( जाहिर दिनांक २०/०७/२०२६ )

१. अर्जदार क्र. १ ने सदर अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा, २००५ (संक्षिप्ततेसाठी येथुन पुढे 'सदर कायदा') च्या कलम १२, १८, १९, २०, २१ व २३ नुसार दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न मुस्लिम धर्मशास्त्र व समाजाचे चालिरितीरिवाजाप्रमाणे दिनांक २९/०९/२०१९ रोजी मौजे कुरेशी हॉल, चंपाचौक, औरंगाबाद येथे झालेला आहे. अर्जदार क्र.१ हिच्या आई–वडीलांनी लग्नाच्या वेळी अर्जदार क्र.१ हिस ५ ग्रॅम सोन्याचे पत्ता मनके, ४ ग्रॅम सोन्याची पोळमाळ, ३ ग्रॅम सोन्याचे कानातले व इतर दागिने (स्त्रीधन) सह संसार उपयोगी पलंग, कपाट, शोकेस, फ्रिज, कुलर, टी.व्ही. व इतर साहित्य दिलेले आहे. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचे पती – पत्नी म्हणुन नातेसंबंध कायम आहेत. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना सदर विवाहातून तीन मुले अर्जदार क्र.२ ते ५ हे झालेले आहेत.

३. अर्जदाराचे पुढे कथन की, लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराचे घरी मौजे औरंगपुरवाडी येथे नांदण्यास गेली. त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ हिला अनेक प्रकारे त्रास देवुन तिचा मानसिक व शारिरीक छळ करत आलेले आहेत. अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार यांनी काही दिवस चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदारांच्या वागणुकीत बदल झाला व ते अर्जदार क्र.१ हिला नेहमी शिवीगाळ व मारहाण करून त्रास देत असत. अर्जदार क्र.१ ही आज ना उदया गैरअर्जदारांच्या वागणुकीत बदल होईल या आशेने गैरअर्जदारांकडे नांदत होती. अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार क्र.१ पासुन दोन्ही मुली झाल्या त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी अर्जदार क्र.१ हिस" तुला दोन्ही मुली झाल्या, तु आमच्या घरातुन निघुन जा, मला तुझी गरज नाही" असे टोमणे देवुन अर्जदार क्र.१ हिस शिवीगाळ करून चापट बुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देवुन अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करू लागले.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदार क्र.१ यास बाहेरख्यालीपणाचा नाद असल्याने तो नेहमी अर्जदार क्र.१ कडे दुर्लक्ष करत आलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ हा दुसऱ्या मुलींसोबत चोरून मोबाईलवर बोलतो. गैरअर्जदार क्र.१ यास वेळोवेळी अर्जदार क्र.१ ने समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदार क्र.१ च्या वागणुकीत बदल झाला नाही. गैरअर्जदार क्र.२ व ३ हे नेहमी अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांच्या संसारामध्ये ढवळाढवळ करण्याचे काम करत असत व गैरअर्जदार क्र.१ ला अर्जदार क्र.१ विषयी काहीही भडकावुन देत तिला त्रास देत आलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ यास आलेली साडे तीन एकर शेतजमीन देखील गैरअर्जदार क्र.२ व ३ हेच करत आलेले आहेत. याबाबत अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदार क्र.१ यास सांगितले असता गैरअर्जदार क्र.१ हा मला शेती करायची नाही, तुला काय करायचे ते कर असे म्हणत असे.

५. अर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदार क्र.१ नेहमी अर्जदार क्र.१ कडे दोन मुली

झाल्यामुळे तिला त्रास देवुन मारहाण करीत असत व माहेराहुन पन्नास हजार रूपये घेवुन येण्याची मागणी करीत असत. अर्जदार क्र.१ च्या आई वडिलांनी गैरअर्जदारांच्या वागणुकीत बदल होईल या आशेने गैरअर्जदार क्र.१ यास पन्नास हजार रूपये दिले होते. परंतु तरी देखील गैरअर्जदार क्र.१ च्या वागणुकीत बदल झाला नाही. अर्जदार क्र.१ चे मामा व इतर नातेवाईक यांनी वेळोवेळी गैरअर्जदारांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या वागणुकीत कोणताही बदल झाला नाही.

६. अर्जदाराचे पुढे कथन की, गैरअर्जदारांच्या विरूध्द अर्जदार क्र. १ ने पोलीस स्टेशन बिडकीन येथे दिनांक २७/०२/२०२३ रोजी ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वी. प्रमाणे तक्रार दाखल केली होती. सदरची प्रकरण क्र.४८२/२०२३ न्यायालयात प्रलंबित आहे. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये समझोता होऊन अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांकडे नांदायला गेली होती. परंतु गैरअर्जदारांनी काही दिवस अर्जदार क्र.१ हिस बरे नांदविले व पुर्वीप्रमाणेच गैरअर्जदार अर्जदार क्र. १ ला त्रास देऊ लागले व अर्जदारांना दोन महिण्यापुर्वी मुलांसह नेसत्या वस्त्रानिशी घरातुन हाकलुन दिले व शिवीगाळ व मारहाण करून अर्जदारास "तुझ्या माहेराहुन एक लाख रूपये घेवुन ये " असे म्हणुन तशी आली तर तुला जिवंत सोडणार नाही अशी जिवे मारण्याची धमकी देवुन मुलांसह माहेरी हाकलुन दिले आहे. तेव्हापासुन अर्जदार ही मुलांसह माहेरी राहत आहे.

७. अर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदार क्र.१ ही नाइलाजास्तव तिचे माहेरी राहुन हलाखीचे जिवन जगत आहे. अर्जदार क्र.१ हिस कुठल्याही प्रकारचा कामधंदा होत नाही व तिला कुठल्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार क्र.१ च्या माहेरची परिस्थती गरीबीची आहे. अर्जदार क्र.१ ही स्वतः चा व अर्जदार क्र.२ ते ४ यांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट गैरअर्जदारांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. गैरअर्जदार क्र.१ हा औरंगरपुरवाडी येथील मदरसामध्ये शिक्षक असुन त्यापासुन त्यास महिण्याकाठी २५ ते ३०

हजार रूपये पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार क्र.१ कडे स्वतःची मौजे तुळापुर वाडी, ता.पैठण, जि. औरंगाबाद येथील जमीन गट क्र.३६ मध्ये १ हेक्टर २१ आर बागायती शेत जमीन असुन त्यापासुन गैरअर्जदार क्र.१ यास वर्षांकाठी तीन ते चार लाख रूपये उत्पन्न मिळते. अशा परिस्थितीत अर्जदार क्र. १ हिने तिच्या उदरनिर्वाहासाठी गैरअर्जदार क्र. १ कडून मासिक पोटगी रुपये १०,०००/- (अक्षरी- दहा हजार रुपये) तसेच अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या औषधपाणी, पालन पोषण व शिक्षणासाठी प्रत्येकी ५,०००/- रुपये (अक्षरी दहा हजार रुपये) मासिक पोटगी, अशी एकुण २५,०००/- रुपये (अक्षरी पंचवीस हजार रुपये) मासिक पोटगी अर्ज दाखल तारखेपासून मिळण्याची तसेच अर्जदार क्र. १ हिचे सर्व सोन्याचे दागिने जे गैरअर्जदारांच्या ताब्यात आहेत ते परत मिळण्याची, तसेच गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ हिस कोणत्याही शारिरीक, मानसिक त्रास देवुन तिचा छळ करु नये, अशाप्रकारचा संरक्षणार्थ हुकूम होण्याची व मानसिक, शारिरीक छळापोटी गैरअर्जदारांकडुन ५,००,०००/- रुपये नुकसान भरपाई मिळण्याची विनंती केली आहे.

८. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी दि.०४.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रथमदर्शनी गैरअर्जदार क्र. १ ते ३ च्या विरुध्द केस दिसुन येत असल्याकारणाने केवळ गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचेविरुध्दच नोटीस काढण्याचा आदेश पारित केला असुन गैरअर्जदार क्र. ४ व ५ यांच्याविरुध्द नोटीस काढण्याची मागणी नाकारलेली आहे. त्याअन्वये नोटीस काढल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ३ या प्रकरणात हजर झाले नाही तसेच सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी दि. ०३.०२.२०२६ रोजी गैरअर्जदारांविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित केला.

९. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. शेख शकील यांनी असा युक्तीवाद केला की, अर्ज एकतर्फा चालला असुन अर्जदाराने दिलेला पुरावा अबाधित राहिल्याने अर्जदाराने तिची केस शाबित केली आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

१०. अर्जातील कथने विचारात घेता या प्रकरणाच्या निर्णयाकरिता खालील मुद्दे विचारार्थ उत्पन्न होतात. त्या मुद्यावरील माझे निष्कर्ष प्रत्येक मुद्याच्या समोर खालीलप्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार क्र. १ वर कौटुंबिक हिंसाचार केला, हे अर्जदार क्र.१ ने सिध्द केले आहे का ? | होय |
| २. | अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ते ३ पासुन संरक्षणाचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होय केवळ गैरअर्जदार क्र. १ ते ३ करिता |
| ३. | अर्जदार क्र. १ ही तिचेसाठी रक्कम रु.१०,०००/– प्रतिमहा, व अर्जदार क्र. २ ते ४ यांचेसाठी रक्कम रु.५,०००/– प्रतिमहा अन्न, वस्त्र निवाऱ्यासाठी पोटगी म्हणुन मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होय अर्जदार क्र. १ हिला रुपये ५०००/– प्रतिमाह व अर्जदार क्र. २ ते ४ यांना रक्कम रुपये २०००/– प्रत्येकी प्रतिमाह |
| ४. | अर्जदार क्र.१ ही नुकसान भरपाईची रक्कम रु.५,००,०००/– मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होय रु.२५०००/– |
| ५. | अर्जदार क्र. १ ही तिचे स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही |
| ६. | आदेश काय ? | अर्ज अंतिम आदेशा प्रमाणे अंशतः मंजूर |

## पुरावा

११. अर्जदार क्र. १ ने तिची बाजु सिध्द करण्याकरिता तिचा पुरावा नि.क्र.१० वर

दिलेला आहे व खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर केला आहे.

१. गट क्र.३६ चा ७/१२ उतारा (नि.क्र.१२)

२. अर्जदार क्र. १, २ व ४ यांचे आधारकार्ड (नि.क्र.१४ ते १६)

३. अर्जदार क्र. ४ चा जन्म दाखला (नि.क्र.१७)

४. विवाह नोंदणी प्रमाणपत्र (नि.क्र.१८)

५. गु.र.क्र.६७/२०२३ चा प्रथमखबरी अहवालाची प्रत (नि.क्र.१९)

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ५ साठी :-**

१२. वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याकारणाने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्या एकत्रीतरित्या चर्चिल्या गेल्या आहेत.

१३. एकंदरीत अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी तिचा शारीरीक, मानसिक व आर्थीक छळ केल्याचे नमुद केले आहे व त्या अनुषंगाने अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचेकडुन पोटगी, संरक्षणात्मक आदेश, नुकसान भरपाई व स्त्रीधन मिळणेबाबत मागण्या केलेल्या आहेत. मात्र या मागण्या मान्य करण्यापुर्वी अर्जदाराने ती कौटुंबिक हिंसाचार पिडीत आहे ही बाब शाबित करणे गरजेचे आहे.

१४. ही बाब शाबित करणे कामी नि.क्र.१० खाली अर्जदाराने तिचे शपथपत्र दिलेले आहे. त्या शपथपत्रातील मजकूर तंतोतंत अर्जातील मजकुराप्रमाणे आहे. अर्ज एकतर्फी चालल्या कारणाने अर्जदाराचा तोंडी पुरावा अबाधित राहिलेला आहे. तिच्या तोंडी पुराव्याला पुष्टी देण्यासाठी अर्जदाराने गु.र.क्र.३७/२०२३ द्वारे बिडकीन पोलीस स्टेशन येथे गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांचेविरुध्द दाखल केलेल्या प्रथमखबरीची प्रत दाखल केलेली आहे. यातील

मजकूर पाहता अर्जदाराने त्यात असे नमुद केले आहे की, अर्जदाराचा गैरअर्जदार क्र. १ यांचेशी मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे विवाह झाला. लग्नानंतर एक वर्ष तिला चांगले नांदवले. या लग्न संबंधातून तिला दि.१७/०७/२०२० रोजी पहिली मुलगी झाली. दि.०५/०९/२०२० रोजी अर्जदार सासरी आल्यानंतर मुलगी झाल्याच्या कारणावरुन व इतर कारणांवरुन गैरअर्जदारांनी तिचा शारीरीक व मानसिक त्रास सुरु केला, शिवीगाळ केली, उपाशी ठेवले, घटस्फोट देण्याचा तगादा लावला व चापटबुक्यांनी मारहाण केल्याचा मजकूर यात नमुद आहे. तसेच या प्रथमखबरीमध्ये अर्जदाराने गैरअर्जदारांनी माहेरहून ५० हजार रुपये घेऊन येण्याची ताकीद दिल्याचा आरोपही केला आहे. तसेच दि.२६/०९/२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी अर्जदाराला शिवीगाळ करुन चापटबुक्यांनी मारहाण केली, माहेरहून पैसे आणण्यासाठी सांगितले व तिच्या अंगावरील सोने ज्यात सोन्याचा नेकलेस, कानातील झुंबर हे त्यांनी त्यांच्याकडे ठेवले व घरात पुन्हा आले असता जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली. सदरहू फिर्याद घटना घडल्यानंतर दि.२७/०२/२०२३ रोजी दिलेली आहे.

१५. ही तक्रार पुराव्यानिशी ठरणारी असली तरी देखील अर्जदाराने गैरअर्जदारांविरुध्द तिच्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ फौजदारी तक्रार दाखल केलेली आहे. ती तिच्या म्हणण्याला दुजोरा देते. याशिवाय याकामी दाखल कौटुंबिक घटना अहवाल यामध्ये देखील वरील बाबी नमुद केलेल्या आहेत त्या देखील अर्जदाराला पुरक आहेत.

१६. याशिवाय गैरअर्जदार यांनी समक्ष येऊन कुठेही अर्जदारासोबत असणारे नाते नाकारलेले नाही. अर्जदाराने नि.क्र.१८ वर विवाह नोंदणी प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. यावरुन असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील आहेत. पती व वडील म्हणुन गैरअर्जदार क्र. १ यांच्यावर अर्जदार क्र. १ ते ४ यांचे पालनपोषण करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदार या माहेरी राहात असल्यापासुन गैरअर्जदार यांनी या जबाबदारीमध्ये निश्चितपणे कसुर केला आहे. यावरुनही

गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार यांचा आर्थीक छळ केल्याचे निष्पन्न होते. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. २ व ३ यांचेविरुध्द केलेला अन्य छळाच्या मजकूर गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी कोठेही नाकारलेला नाही व तो अबाधित राहिल्याने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदाराचा कौटुंबिक छळ केल्याची बाब शाबित होते.

१७. वरील बाब शाबित असल्याकारणाने अर्जदार ही अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदारांविरुध्द संरक्षणात्मक आदेश मिळण्यास पात्र आहे.

१८. याशिवाय अर्जदाराने तिच्या स्त्रीधनाबाबत विशेषतः गैरअर्जदारांनी तिच्या अंगावरील सर्व सोन्याचे व चांदीचे दागिने काढुन घेतल्याचा मजकूर नमुद केलेला आहे. अर्जदाराचा पुरावा जरी अखंडीत राहिला असला तरीही अर्जदाराच्या लग्नात किंवा अर्जदाराकडे अर्जात नमुद केल्याप्रमाणे सोन्याचे व चांदीचे दागिने होते हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. याबाबत अर्जदार दागिन्यांच्या पावत्या किंवा दागिने दाखवणारा फोटो पटलावर दाखल करु शकली असती मात्र तसा कोणताही पुरावा अर्जदाराने पटलावर दाखल केला नाही. परिणामी अर्जदार ही अर्जात नमुद केल्याप्रमाणे तिच्या स्त्रीधनाबाबत कोणताही आदेश मिळण्यास पात्र नाही.

१९. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ कडुन स्वतःसाठी रक्कम रु.१० हजार व अर्जदार क्र. २ ते ४ यांचेसाठी रक्कम रु.५ हजार पोटगी मिळण्याची मागणी केलेली आहे. हा आदेश पारित करतांना अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असुन अर्जदाराकडे कोणतेही पुरेसे उत्पन्नाचे साधन नाही ही बाब शाबित करणे गरजेचे आहे.

२०. त्या अनुषंगाने अर्जदाराने शपथेवर असे कथन केले आहे की, तिच्याकडे कोणत्याही प्रकारचा कामधंदा नसुन कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तिच्या माहेरील आर्थीक

परिस्थीती चांगली नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदाराने तिचे मिळकतीचे शपथपत्र दाखल केलेले आहे ज्यामध्ये तिने ती घरकाम करत असल्याबाबत कथन करत मासिक खर्च रक्कम रु.२५ हजार दाखवला आहे. ही बाब देखील अबाधित राहिल्याने असे दिसुन येते की, अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन ती माहेरी राहात आहे व तिच्यावर अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या पालनपोषणाची जबाबदारी देखील आहे.

२१. याउलट अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ हा औरंगपुरवाडी येथील मदरसामध्ये शिक्षक असुन त्यापासुन त्यास महिण्याकाठी २५ ते ३० हजार रूपये पगार मिळतो असे कथन केले आहे. मात्र याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न शाबित करण्यासाठी अर्जदार ही संबंधित मदरसा अधिकारी/कर्मचारी यांची साक्ष नोंदवून गैरअर्जदार क्र. १ यांच्या उत्पन्नाबाबत पुरावा दाखल करु शकली असती मात्र तो तिने दाखल केलेला नाही. गैरअर्जदार यांचेकडे स्वतःची मौजे तुळापुर वाडी, ता.पैठण, जि. औरंगाबाद येथील जमीन गट क्र.३६ मध्ये १ हेक्टर २१ आर बागायती शेत जमीन असल्याचे कथन आहे. ही बाब शाबित करण्यासाठी गट क्र.३६ चा ७/१२ उतारा (नि.क्र.१२) दाखल केलेला आहे. हा ७/१२ उतारा गैरअर्जदार क्र. ५ रशीद मोहम्मद बेग यांचे नावे आहे. रशीद मोहम्मद बेग हे अर्जदारचे चुलत सासरे आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे गैरअर्जदार क्र. ४ व ५ यांना याकामी नोटीस काढण्यात आलेली नाही. अशा परिस्थीतीत गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना गट क्र. ३६ मधुन उत्पन्न मिळते हे दाखवण्यासाठी अर्जदाराने गट क्र.३६ ही वडीलोपार्जित मिळत असुन त्यातील उत्पन्न गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे घेतात याबाबतचा स्पष्ट उल्लेख करणे गरजेचे होते मात्र तसा कोणताही उल्लेख अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये केलेला नाही. सबब गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना गट क्र ३६ मधुन उत्पन्न मिळते ही बाब ग्राहय धरता येणार नाही. अर्जात कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यास वर्षाकाठी तीन ते चार लाख रूपये उत्पन्न मिळते तसेच त्याच्यावर त्याच्या आईव्यतिरिक्त अर्जदारांशिवाय इतर कोणीही अवलंबुन नाही हे सिध्द करणारा कोणताही ठोस पुरावा अर्जदाराने याकामी दाखल केलेला नाही. सबब

गैरअर्जदार क्र. १ चे निश्चित उत्पन्न् पटलावर येऊ शकले नाही.असे असले तरीही याकामी अर्जदाराने त्यांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र याकामी दाखल केले आहे त्याचे बारकाईने अवलोकन केले असता त्यामध्ये गैरअर्जदार याचा धंदा शिक्षक म्हणुन दाखवलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांचा व्यवसाय शिक्षक म्हणुन ग्राहय धरला असता आज घडीला निश्चितपणे ते रक्कम रु.२०–२५ हजार इतका पगार कमवत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२२. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसतांना ती माहेरी राहते. आज कालची महागाई तसेच मुलांच्या शिक्षणाचा व पालनपोषणाचा खर्च विचारात घेता माझे मते गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला दरमहा पोटगी पोटी रक्कम रु.५०००/– व अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या पालनपोषणासाठी दरमहा प्रत्येकी रक्कम रु.२ हजार पोटगी देण्याचा आदेश करणे योग्य व रास्त होईल.

२३. अर्जदाराने ती कौटुंबिक हिंसाचार पिडीत आहे ही बाब शाबित केल्या कारणाने ती गैरअर्जदार क्र. १ याचेकडुन रक्कम रु.२५०००/– इतकी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

२४. सबब वरील कारणमिमांसा विचारात घेत मी मुद्दा क्र. १ चे होकारार्थी, मुद्दा क्र. २ ते ४ चे अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र. ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. परिणामी अर्जदार अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र. ६ साठी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला आहे.

२. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी वैयक्तीकरित्या किंवा संयुक्तपणे अर्जदारांवर कौटुंबिक

हिंसाचाराचे असे कोणतेही कृत्य करु नये असा संरक्षणात्मक आदेश देण्यात येतो.

३. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र. १ हिला रक्कम रुपये ५०००/– प्रतिमाह व अर्जदार क्र. २ ते ४ यांना रक्कम रुपये २०००/– प्रत्येकी प्रतिमाह अर्ज दाखल दिनांकापासुन पोटगी पोटी संयुक्त रक्कम म्हणुन द्यायची आहे.

४. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणुन रु.२५,०००/– आदेश दिनाकांपासुन ६० दिवसाचे आत देण्याचा आदेश पारित करण्यात येतो.

५. अर्जदार हिची तिचे स्त्रीधन परत मिळण्याबाबतची मागणी नामंजूर करण्यात येते.

६. पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन **बिडकीन** व संरक्षण अधिकारी संरक्षणात्मक आदेशाची अंमलबजावणी करावी व त्याकामी आदेशाची एक प्रत त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

७. सदर आदेशाची एक प्रत प्रस्तुत प्रकरणातील उभयपक्ष, **बिडकीन** पोलीस स्टेशनचे अधिकारी व संरक्षण अधिकारी यांना मोफत देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by METIL SHITAL MADHUKAR
Date: 2026.07.20 17:40:30 +0530

दिनांक – २०/०७/२०२६

**(एस. व्ही. मेटील–पाटील)**
न्यायदंडाधीकारी प्रथमवर्ग
(न्यायालय क्र.१),पैठण

# CERTIFICATE

I affirmed that, the contents of this PDF file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S.M.Sakhare (Grade-3) |
| Court Name | : | Shri. S. V. Metil-Patil, Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Court No.01 Paithan. |
| Order signed by P.O. | : | 20/07/2026 |
| Order uploaded on | : | 20/07/2026 |